Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प रि प त्र क

२७/२०२१

विषय - कोविड-१९ च्या अनुषंगाने घ्यावयाची काळजी

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक २१ एप्रिल, २०२१.
२. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. आस्थापना १०५९/ दि.२२ एप्रिल, २०२१,
३. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. आस्थापना १०७३/ दि.२७ एप्रिल, २०२१,
४. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक २९ एप्रिल, २०२१.
५. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. आस्थापना १०८३/ दि.३० एप्रिल, २०२१,

उपरोक्त विषयसंदर्भीय पत्रास अनुसरून सर्व संबधिताना आदेशान्वये कळविण्यात येते की, सरकारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार, कोविड-१९ संसर्गाचा वाढत असलेला प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने वेळोवेळी निर्देश निर्गमीत करण्यात आले आहेत. त्यास अनुसरून काही उपाययोजना व सुचनांचे काटेकोर पालन करण्यासाठी खालील प्रमाणे निर्देश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी नियमितपणे मास्कचा वापर करावा मास्क परिधान केल्याशिवाय कुठेही वावर करू नये. याचबरोबर शासनाने वेळोवेळी निर्देशित केलेनुसार योग्य ते सामाजिक आंतर राखणे, सॅनिटायझरचा वापर करणे, तसेच वारंवार हात धूणे, इ. आवश्यक बाबींची कटाक्षाने पालन करावे.

२. सर्वांनी प्राध्यान्याने आपल्या स्वतच्या तसेच आपल्या कुटूंबियांच्या आरोग्याची काळजी घेण्यात यावी. आपणांस अथवा आपल्या कुटूंबातील इतर सदस्यांच्या प्रकृतीमध्ये थोडाफार जरी फरक जाणवल्यास आपल्या डॉक्टरांकडून त्वरीत उपचार करून घ्यावेत. आवश्यकता वाटल्यास विद्यापीठ आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिका-यांचेदेखील सहाय्य घ्यावे. विद्यापीठाच्या वसतिगृहामध्ये स्थापित कोरोना केअर सेंटर मध्ये विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक अधिकारी, सेवक तसेच त्यांचे कुटूंबीय यांचेकरिता ५० बेड आरक्षित करण्याबाबत मा.जिल्हाधिकारीसो यांना कळविले असून संबंधित अधिका-यांनी आवश्यकतेनुसार बेड उपलब्ध असलेस प्राधान्याने विद्यापीठ कर्मचारी यांना उपलब्ध करून देण्यात यईल असे अश्वासित केले आहे. याअनुषंगाने जर या बाबीची आवश्यकता भासलेस डॉ.यु.के.सकट, सहा-कुलसचिव तथा समन्वय अधिकारी, कोरोना केअर सेंटर, मुलांचे वसतिगृह १, २ व ३, श्री.बी.एन.वाघमोडे, सहा-कुलसचिव तथा समन्वय अधिकारी, कोरोना केअर सेंटर, तंत्रज्ञान अधिविभाग वसतिगृहे तसेच, डॉ.व्ही.डी.नांदवडेकर, कुलसचिव यांचेशी संपर्क साधावा.

३. उपरोक्त संदर्भ क्र.५ नुसार सर्व संबंधितांनी कार्यालयीन उपस्थितीबाबत योग्य ते नियोजन करावे. शक्यतो संबंधितांनी ऑनलाईन पध्दतीने/Work from Home कार्यालयीन कामकाज करण्याचा प्रयत्न करावा. जे शिक्षक/अधिकारी व सेवक घरी राहणार आहेत/घरी राहून काम करणार आहेत त्यांनी आपल्या मोबाईल क्रमांक व ईमेलद्वारे आपल्या वरिष्ठ व कार्यालयीन सहकारी यांना उपलब्ध राहावे.

४. अत्यावश्यक सेवा प्रदान करणाऱ्या विभागांची सेवा व्यवस्थितरित्या सुरू राहील याची योग्य ती दक्षता संबधित विभागप्रमुख यांनी घ्यावी व त्याप्रमाणे नियोजन करावे.

५. विद्यापीठ अधिविभाग व प्रशासकीय विभागातील कार्यरत असणा-या सर्व रोजंदारी/हंगामी सेवक व एकत्रित मानधनावर नियुक्त सेवक/पेजबेसीस व इतर तत्सम सेवकांची सेवा पुढील आदेश होईपर्यंत बंद करण्यात यावी. याबाबतीत अत्यंत आवश्यकता भासलेस संबंधित अधिविभागप्रमुख/विभागप्रमुखांनी वरिष्ठ प्रशासकीय अधिका-यांच्या निदर्शनास सदरची बाब आणून योग्य तो निर्णय घ्यावा.

६. सर्व संबंधितांनी आपल्या नेमणूकीचा अधिविभाग/विभाग सोडून इतर विभागांना भेटी देवू नयेत. कार्यालयीन कामकाजाची आवश्यकता भासलेस याकरिता फक्त कार्यालयीन ई-मेल व दुरध्वनीचाच कटाक्षाने वापर करण्यात यावा. तसेच, विविध घटकांनी आपला पत्रव्यवहार ई-मेल व्दारेच करावा (कोविड-१९ च्या काळात)

७. शासनाच्या सूचनेनुसार वय वर्षे १८ च्या वरील सर्वांनी लवकरात लवकर लसीकरण करून घेणे आवश्यक आहे. याबाबतची विद्यापीठातील सर्व अधिविभाग/प्रशासकीय विभागप्रमुख यांनी आपल्या संबंधित अधिविभाग/विभागातील **शिक्षक, अधिकारी, सेवक यांनी अद्यापही लस घेतली आहे किंवा नाही, याची माहिती गुगल फॉर्मव्दारे सदरच्या लिंकवर** https://forms.gle/eGZMX3ELRNWJShpE9 **त्वरीत कळवावी.**

कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जा.क्र. आस्थापना/ 1094
दि. 05 MAY 2021

प्रति,
१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, रेक्टर्स. अधिकारी व सेवक
२) मा.कुलगुरु, मा.प्र-कुलगुरु, मा.कुलसचिव, मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा.वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागामध्ये शिक्षक, अधिकारी व सेवकांच्या निदर्शनास आणावे.